महाराष्ट्र शासन

# डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,विष्णुपुरी, नांदेड

## Dr.Shankarrao Chavan Govt.Medical College, Vishnupuri, Nanded.

Dean Chember - (02462) 229275 Fax No. 02462 – 229336 E-mail "gmcnanded @ rediff mail.com."

जा.क्र.डॉशंचशावैमनां/आस्था-२/जाहीरात/0482/२०२४ दि. 12/१२/२०२४

## जाहिरात

विषय:- डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ( विष्णुपूरी ) नांदेड येथील सहाय्यक प्राध्यापक/साथरोगतज्ञ नि-अधिव्याख्याता/प्रसुतीपूर्व वालकल्याण अधिकारी नि अधिव्याख्याता/स्त्री वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ ही रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात भरणे वावत. .

या संस्थेतील विविध विषयांतील सहाय्यक प्राध्यापक, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी, नांदेड येथील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात भरण्यासाठी अर्हता प्राप्त उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. दिनांक13 /१२/२०२४ ते दिनांक 19/१२/२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत अर्ज वाटप करणे व स्विकारले जातील. सहाय्यक प्राध्यापक/साथरोगतज्ञ नि-अधिव्याख्याता/प्रसुतीपूर्व वालकल्याण अधिकारी नि अधिव्याख्याता/या पदासाठी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी तसेच स्त्री वैद्यकीय अधिकारी या पदासाठी पदवी व डि.जी.ओ किंवा पदव्युत्तर अर्हता (स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र ) प्राप्त उमेदवारांनी अर्ज करावे. सदरील पदाकरिता उमेदवारांची नियुक्ती ३६४ दिवस समाप्त होईपर्यंत किंवा सदर पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशनाने उमेदवार उपलब्ध अथवा वदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यत अथवा उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणुक या कारणासाठी त्यांची नियुक्ती कोणत्याही पुर्वसुचनेशिवाय संपुष्ठात येईल. (यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत) करण्यात येईल.

सहाय्यक प्राध्यापक/साथरोगतज्ञ नि-अधिव्याख्याता/ प्रसुतीपूर्व वालकल्याण अधिकारी नि अधिव्याख्याता/ स्त्री वैद्यकीय अधिकारी ही पदे भरण्यासाठी पदांची आरक्षणासहित माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | विभागाचे नाव व पदनाम | एकुण रिक्त पदे | अजा १३% | अज ७% | विजा -अ ३% | भज-ब २.५% | भज-क ३.५% | भज-ड ३.५% | विमाप्र २% | इमाव १९% | इडब्लुएस १०% | एसईबिसी १०% | अराखीव २८% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वधीरीकरणशास्त्र, सहाय्यक प्राध्यापक | १ | -- | - | - | - | - | - | १* | - | - | - | - |
| २ | जीवरसायनशास्त्र सहाय्यक प्राध्यापक | २ | -- | - | - | - | - | - | -- | १ | — | - | १* |
| ३ | जनऔषधवैद्यकशास्त्र सहाय्यक प्राध्यापक | १ | - | - | - | - | - | -- | -- | -- | - | - | १* |
| ४ | जनऔषधवैद्यकशास्त्र साथरोगतज्ञ नि अधिव्याख्याता | १ | १** | - | - | - | - | - | - | - | - | - | — |
| ५ | जनऔषधवैद्यकशास्त्र स्त्री वैद्यकीय अधिकारी | १ | -- | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ६ | दंतशल्यचिकित्साशास्त्र, सहाय्यक प्राध्यापक | १ | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र सहाय्यक प्राध्यापक | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | — | १ |
| ७ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र प्रसुतीपूर्व वालकल्याण अधिकारी नि-अधिव्याख्याता | १ | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | -- |
| ८ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र, सहाय्यक प्राध्यापक | १ | -- | - | - | - | - | - | - | - | - | १ | -- |
| ९ | शरीरविकृतीशास्त्र सहाय्यक प्राध्यापक | १ | १ | - | -- | - | - | - | - | - | - | - | - |
| १० | क्षकिरणशास्त्र सहाय्यक प्राध्यापक | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | - |
| ११ | एकुण | १२ | २ | १ | -- | - | - | -- | १ | २ | १ | १ | ४ |

टिप:- १) * च्या जागी महिला साठी राखीव राहील.

२) ** च्या जागी दिव्यांगासाठी राखीव राहील

डिएसवी सप्टें-२०२४

Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती

१) संबधीत विषयातील पदव्युत्तर पदवीस भारतीय आर्युविज्ञान परीषदेची मान्यता असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

२) सदरील तात्पुरती नियुक्ती ही शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील नियम व अटीशर्तीनुसार राहील.

वरील नमुद पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती शासन निर्णयानुसार ३६४ दिवसासाठी अस्थायी स्वरुपाची राहील. सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अथवा नामनिर्देशनाने तसेच मध्यवर्ती समितीच्या शिफारशीने भरली जाईपर्यंत तसेच बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यत अथवा शासनाचे पुढील आदेश उपलब्ध होईपर्यंत तसेच उमेदवाराचे कामकाज समानाधनकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणुक या कारणासाठी त्यांची नियुक्ती कोणत्याही पुर्वसुचनेशिवाय संपुष्टात येईल. उमेदवाराची निवड गुणानुक्रमे व प्रयत्न प्रमाणपत्रे विचारात घेऊन करण्यात येईल. त्याचप्रमाणे मागासवर्गीयांसाठी आरक्षीत पदासाठी उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर संवर्गातून अंतर्गत गुणवतेनुसार निवड करण्यात येईल. तसेच उमेदवार इतर संस्थेत कार्यरत असल्यास आवेदन पत्र भरताना किंवा मुलाखतीच्या दिवशीपर्यंत ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

अर्ज सादर करण्याची वेळ व पत्ता

उपरोक्त नमुद अर्ज कार्यालयात (डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी, नांदेड) येथे सादर करण्याची दि. /१२/२०२४ ते दि. /१२/२०२४ पर्यत वेळ सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० पर्यत राहील. तद्नंतर अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अपूर्ण अर्ज अथवा साक्षांकीत केलेले प्रमाणपत्र जोडले नसल्यास त्याचा विचार केला जाणार नाही. मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल व मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील मुलाखत ही डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपूरी नांदेड मधील महाविद्यालयीन परीषद सभागृह येथे राहील.

नोट : वरील जाहीरातमधील आरक्षीत पदांची संख्या कमी किंवा अधिक करण्याचा तसेच निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबीत ठेवण्याचे तसेच नियुक्ती आदेश रद्द करण्याचे अधिकार आणि नमुद जाहीरात रद्द निवड समिती यांच्याकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

१) **सहाय्यक प्राध्यापक वर्ग-२ या पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता :-**

- मान्यता प्राप्त संस्थेतून संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी/तत्सम अर्हता व सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार.
- वरिष्ठ निवासी एक वर्ष पुर्ण केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.
- सहाय्यक प्राध्यापक यांना रु. १ लक्ष मानधन राहील.
- स्त्री- वैद्यकीय अधिकारी यांना रु. ८५ हजार मानधन राहील.
- वयोमर्यादा खुला प्रर्वगासाठी वयोमर्यादा ३८ वर्ष (मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षापर्यंत शिथिलक्षम)
- या संस्थेतील उत्तीर्ण पदवी किंवा पदव्युत्तर विद्यार्थी असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

२) **स्त्री-वैद्यकीय अधिकारी या पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता :-**

- एम.बी.बी.एस./एम.एस. स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र यांना प्राधान्य.
- सदर पदावर रु.८५०००/- हजार मानधन राहील.(शासन निर्णया प्रमाणे)
- बंधपत्रीत उमेदवारांना सदर नियुक्तीसाठी प्राधान्य देण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज करण्याचा दिनांक | दि.13/१२/२०२४ ते19/१२/२०२४ |
| २ | अर्जाची किमत | रु. २०० रोखपाल यांच्याकडे रोखीने पैसे भरुन पावती घेणे. |
| ३ | अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख | दि.19/१२/२०२४ सायंकाळी ०५:०० पर्यत |
| ४ | मुळ कागदपत्रे तपासणी आणि मुलाखतीचा दिनांक व वेळ तसेच ठिकाण | दि.23/१२/२०२४ वेळ : ११ .०० वाजता<br>ठिकाण: डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी, नांदेड |

(डॉ. सुधीर भा.देशमुख),
अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णूपूरी,नांदेड

प्रत, १) मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२) सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (इमेलव्दारे)
३) सुचना फलक, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय, विष्णूपूरी,नांदेड
४) डॉ. इनामदार इस्माईल अली, सहयोगी प्राध्यापक, जनऔषधवैद्यकशास्त्र, डॉ.शं.च. शा. वै. म. नांदेड यांना देऊन कळविण्यात येते की, उपरोक्त नमुद जाहीरात संस्थेच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी.
५) रोखपाल, डॉ.शं.च. डॉ.शं.च. शा. वै. म. नांदेड यांना माहितीस्तव

डिएसवी सप्टें-२०२४

Scanned with OKEN Scanner